# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०६/२०२५ (शनिवार)**

---

## अवैधरित्या अग्निशस्त्र (माउजर) बाळगणाऱ्या अरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १ आरोपी अटक,स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक २०/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा कांद्री बस स्टॉप येथे इसम नामे रजत दोंदलकर हा पांढऱ्या चेक्स् चे शर्ट घालुन असुन तो अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन असुन तो कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे तयारीत आहे. अशी माहीती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी गेले असता मौजा कांद्री बस स्टॉप येथे मिळालेल्या माहीती आणि वर्णनानुसार एक इसम दिसुन आला. पोलीसांनी त्याला नाव पत्ता विचारले असता त्याचे **नाव रजत राजेश दोंदलकर, वय २४ वर्षे, रा.कांद्री माईन्स् प्रेमनगर वार्ड क्रं ५ मनसर ता.रामटेक, जि नागपुर अशी माहीती समजली.** पोलीसांनी नमुद इसमाची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे जवळ एक लोखंडी देशी माउजर सह दोन जिवंत काडतुस मिळुन आले. आरोपीला शस्त्र परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. तसेच त्याने सदर अग्निशस्त्र हे १ वर्षापुर्वी **आरोपी नामे शाहरूख उर्फ सौरभ राजपुत रा. बैतुल ,मध्यप्रदेश याचे कडुन विकत घेतल्याचे सांगितले**.पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक लोखंडी देशी बनावटीचे माउजर किंमती ४०,०००/— रूपये , २ जिंवत काडतुस किंमती २०००/— रूपये ,अॅड्रॉईड मोबाईल आणि रोख रक्कमेसह एकुण ६०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपी क्रं १ नामे— रजत राजेश दोंदलकर, वय २४ वर्षे, रा.कांद्री माईन्स् प्रेमनगर वार्ड क्रं ५ मनसर ता.रामटेक, जि नागपुर आणि आरोपी क्रं २. शाहरूख उर्फ सौरभ राजपुत रा. बैतुल ,मध्यप्रदेश यांच्या विरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३,५,२५ शस्त्र**

अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्रं १ याला पोलीसांनी अटक केली आहे.






## झुम कार बुकींग ॲपचा वापर करून बकरी चोरी करणारे आरोपी अटक,चोरीचे ३ गुन्हे उघड ,५ आरोपी अटक, ९ लाख ३३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कामगिरी

दिनांक २०/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक पोलीस स्टेशन काटोल येथील घरफोडीच्या गुन्हयाच्या तपासासंदर्भात काटोल उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदारा मार्फत खबर मिळाली की, एक पांढऱ्या रंगाची मारुती एक्सप्रेसो गाडी क्र. एम.एच ४९ बी डब्ल्यु ७२६४ ही गाडी काटोल ते सावरगाव रोडवर सशंयीरित्या उभी आहे. अशी माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे तात्काळ त्या ठिकाणी पोहचले असता नमुद संशयीत एक्सप्रेसो गाडी क्र. एम.एच ४९ बी डब्ल्यु ७२६४ गाडीमध्ये ४ युवक बसून दिसले. त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता **आरोपी क्रं १) जावेद खान अश्फाक खान, वय ३२ वर्ष, रा. ५४ वाईट चर्च पल्लोटी नगर, गोरेवाडा रोड नागपूर २) अभिषेक योगेश्वर तागडे, वय २२ वर्ष, रा. सुरेंद्रगड शांती किराणा जवळ, सेमीनेरी हिल्स गिटीखदान, नागपूर ३) उस्मान खान अकबर खान उर्फ इरफान, वय २१ वर्षे रा. बरकाते रजा मज्जीद , कामगार नगर नागपूर आणि ४) विधी संघर्षग्रस्त बालक अशी माहीती प्राप्त झाली.**

आरोपीतांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता आरोपी क्रं १ याने सांगीतले की , दिनांक १०/०६/२०२५ रोजीचे रात्री त्याचे साथीदारासह आरोपी क्रं ५) **अक्षय मनोज पंचलवार वय २६ वर्षे रा.इंगोले ले आउट गोधणी रोड नागपुर** यांचे मालकीचे बोलेरो वाहन क्र. एमएच २१ सी २१३२ याने मौजा भिष्णुर हद्दीत नदी काठचे एका गोठयातुन १० बकऱ्या चोरी केल्या. त्यांनतर दिनांक १४/०६/२०२५ चे रात्री दरम्यान पुन्हा आरोपी क्रं १ याने स्वत:चे मोबाईल वरून झुम कार बुकींग ॲप द्वारे मारूती सुझुकी अरटिगा वाहन बुक करून त्या वाहनाने त्याचे साथीदार यांचे सह मौजा भिष्णुर हद्दीतील अवलिया बाबा दर्गा जवळुन एका गोठयातुन ०९ बकऱ्या चोरी केल्या. दिनांक २०/०५/२५ रोजी सुध्दा आरोपी क्रं १ याने स्वत:चे मोबाईल वरून झुम कार बुकींग ॲप द्वारे महीद्रा टीयुव्ही वाहन बुक करून टीयुव्ही वाहनाने आणि त्याच्या साथीदारांनी मौजा सावरगाव हद्दीतील सांवगी शिवारातील एका शेतामुधन ३ बकऱ्या चोरल्या. बकऱ्या चोरी करून **आरोपी क्रं ६) नामे भुऱ्या उर्फ प्रकाश देवराव माहुरे वय ४० वर्षे रा. चंद्रकला नगर ,तांडापेठ कलकत्ता लाईन नागपुर यास विकल्याचे सांगीतले . तसेच सदर गुन्हयात आरोपी क्रं** ७) **बाबू उर्फ मायकल गुड्डु फ्रान्सिस वय १८ वर्ष, रा. ढोरे ले आउट मानकापूर नागपूर आणि पाहीजे आरोपी क्रं** ८) **नामे तुषार अनिल शर्मा रा.मानकापूर नागपूर यांचा सुध्दा सहभाग असल्याचे पोलीस तपासत निष्पन्न झाले. पोलीसांनी तात्काळ इतर आरांपीतांना शोध घेवुन त्यांना नागपुर येथुन ताब्यात घेतले.**

**पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन १) वेगवेगळ्या कंपनीचे ६ अँड्रॉइड मोबाइल फोन १ आणि कीपॅड मोबाईल फोन किंमती .५३,०००/— रूपये, २) रोख रक्कम ८०,०००/— रूपये ३) मारुती सुझुकी एक्प्रेसो वाहन क्र. एम एच ४९ बीडब्ल्यु ७२६४ किंमती . ४,००,०००/— रूपये ४) महिंद्रा बुलेरो वाहन क्रं एमएच २१ सी २१३२ की. ४,००,०००/— रूपये असा एकूण मुद्देमाल ९,३३,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदर गुन्हयाचा जप्त मुद्‌देमाल संबधीत पोलीसांना हस्तांतरीत करण्यात आला आहे. **जलालखेडा पोलीसांनी आरोपी नामे जावेद खान अश्फाक खान,अभिषेक योगेश्वर तागडे, उस्मान उर्फ इरफान खान अकबर खान, अक्षय मनोज पंचलवार, आणि आरोपी नामे बाबू उर्फ मायकल गुड्डु फ्रान्सिस या आरोपीतांना अटक केली आहे. सर्व आरोपीतांचा दिनांक २३/०६/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

**उघड गुन्हे.**

१) पो. स्टे.  जलालखेडा अप क्र २६९/२०२५ कलम ३३१(४),३०५ भान्यासं

२). पो. स्टे. जलालखेडा अप क्र.२७०/२५ कलम ३०३(२), भान्यासं

३)  पो. स्टे. नरखेड अप क्र ३७५/ २०२५ कलम ३०३(२) भान्यासं



# पोलीस स्टेशन बोरी हद्दीत ५२ तासपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्यां ८ आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ६ दुचाकी आणि ४ मोबाईल सह एकुण ३ लाख ५७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त,उपविभागिय पोलीस अधिकारी नागपुर ग्रामीण आणि पथक यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी:—** दिनांक २१/०६/२०२५ रोजी श्री दिपक अग्रववाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर हे त्यांच्या पथकांसह अवैध धंदयावर कारवाई करणे कामी बुटीबोरी शहर परीसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, ड्रीम स्कुल बोरी च्या बाजुला काही इसम काही इसम ५२ तासपत्त्यांवर पैशाची बाजी लावुन हार जीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन पाहणी केली असता काही इसम ५२ तासपत्त्यांचा जुगार खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी सापळा रचुन धाड टाकुन चार आरोपीतांना शिताफिने जागीच पकडले काही आरोपी पोलीसांनी पाहुन पळुन गेले. आरोपी क्रं **१) आशिष सोमेश्वर पुरी, वय. ३१ वर्षे, रा. जवळी ता भिवापुर जि. नागपुर,ह.मु. वर्धमान नगर बुटीबोरी, आरोपी क्र. २) आकाश बाळकृष्ण गोडणे ,वय ३० वर्षे, रा वार्ड क्रं ५ बुटीबोरी, जि. नागपुर आरोपी क्रं ३) साजीद छोटु शेख, वय ३० वर्षे, वार्ड क्र २, जुनी वस्ती, बुटीबोरी आणि आरोपी क्रं ४) करण बाजीराव खरकाटे , वय २४ वर्षे, वार्ड क्र ४, बुटीबोरी हे आरोपी जागीच मिळुन आले. घटनास्थळावर ५२ तासपत्ते व डावावरील ३५०० /— रूपये मिळुन आले. घटनास्थळाच्या बाजुला ॲक्टीव्हा मोपेड गाडी क्रं एम.एच ४० ए.एफ.७७०१, बर्गमॅन मोपेड गाडी क्रं एम.एच ४० सी.आर ३९५९, बर्गमॅन मोपेड गाडी क्रं एम.एच ४० सी.यु ८२०६ , मोटर सायकल होंडा लिवो एम.एच ४० बी.व्ही ८९८८ , मोटर सायकल आपाचे एम.एच ४० सी.झेड ६२१५ आणि ॲक्टीव्हा मोपेड गाडी क्रं एम.एच ४० सी.व्ही ९९६५ असा एकुण ३,२३,५००/— रूपयांचा मुद्देमाल मिळाला. तसेच आरोपी क्रं १ ते ४ यांचे अंगझडतीमध्ये रोख रक्कम २०००/— रूपये आणि ४ ॲड्रॉइड मोबाईल असा एकुण ३४,००० मुद्देमाल मिळाला,एकुण ३,५७,५०० जप्त /— रूपयांचा मुद्देमाल करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपी क्रं १) ते ४) आणि आरोपी क्रं ५) ॲक्टीव्हा मोपेड गाडी क्रं एम.एच ४० ए.एफ. ७७०१ चा ताबाधारक, आरोपी क्रं ६) बर्गमॅन मोपेड गाडी क्रं एम.एच ४० सी. आर ३९५९ चा ताबाधारक आरोपी क्रं ७) बर्गमॅन मोपेड गाडी क्रं एम एच ४० सी.यु ८२०६ चा ताबाधारक, आणि आरोपी क्रं ८) मोटर सायकल होंडा लिवो एम.एच ४० बी.व्ही ८९८८ चा ताबाधारक यांच्यांविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## १३ गोवंश जनावरांची सुटका,मौदा पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २०/०६/२०२५ रोजी मौदा पोलीस गौण खनिज वाहतुन तपासणी नाका , माथनी टोलनाका समोर नाकाबंदी करीत असताना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच ४९ ए टी ९६१२ मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नाकाबंदी दरम्यान वाहन क्र. एम एच ४९ ए टी ९६१२ या वाहनाला थांबवुन तपासणी केली असता त्यात **१३ गोवंश जनावरे** मिळुन आले. चालककाला नाव पत्ता विचारले असता वाहन चालक/मालक आरोपी नामे शेख मोसीन शेख नासीर, वय ३२ वर्ष, रा. भोईपुरा, कामठी ता. कामठी ,अशी माहीती समजली. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावरे खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. पोलीसांनी पंचासमक्ष **बोलेरो पिकअप वाहन क्र. एम एच ४९ ए टी ९६१२ किंमती ४,००,०००/— रूपये. व १३ गोवंश जनावरे किंमती १,३०,००० /— रूपये असा एकुण किंमती ५,३०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी चालक आरोपी नामे शेख मोसीन शेख नासीर, वय ३२ वर्ष, रा. भोईपुरा, कामठी ता. कामठी याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## जनावरांना निदर्यतेने वागविणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक १९/०६/२०२५ कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मांढळ येथे वार्ड क्रं ४ मध्ये रमजान शेख यांचे घराजवळ गोवंश जनावरांना बांधुन ठेवले असुन सदर जनावारांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता आखुड दोरखंडाने बांधुन ठेवल्या बााबत माहीती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पोलीसांनी घटनास्थळी जावुन पाहणी केली असता घटनास्थळी ५ गोवंश जनावरे कोणतीही चारापाण्याची सोय न करता आखुड दोरखंडाने बांधुन,जनावरांची उपासमार होईल अशा परिस्थितीत मिळुन आले. पोलीसांनी घटनास्थळी सदर बाबतीत चौकशी केली असता सदर जनावरे रमजान शेख याचे असल्याची माहीती मिळाली. पोलीसांनी रमजान शेख चा त्याच्या घरी जावुन शोध घेतला परंतु तो मिळुन आला नाही. रमजान शेख चे घरी सदर जनावरांबाबत विचारपुस करून जनावरांच्या खरेदी विक्री पावत्या बाबत विचारले असता त्यांनी कोणतीही पावती सादर केली नाही.

**पोलीसांनी पंचासमक्ष ५ गोवंश जनावरे किंमती ७७,००० /— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या ५ गोवंश जनावरांना सिल्ली येथील गोशाळेत दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद प्रकरणी आरोपी नामे रमजान शेख रा. मांढळ, ता. कुही याच्या विरूध्द पोस्टे कुही येथे प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने